*मुद्रा यशोगाथा*

**नाव :- श्री. गुरूदास अशोक पांडव व श्री. तेजस गायकवाड, जि.कोल्हापूर**

*व्यवसाय :- कोल्हापूरी चप्पल उद्योग*

*संक्षिप्त माहिती :- श्री.गुरुदास पांडव व श्री.तेजस गायकवाड हे कोल्हापूरी चप्पल उत्पादन व विक्री करतात. कोल्हापूर ही कोल्हापूरी चप्पलांची बाजारपेठ असून, कोल्हापूरी चप्पलांचे नांव भारतभर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यास या प्रकल्पाची मदत होईल. मुद्रा योजनेतून कर्ज घेण्यापूर्वी लाभार्थी चप्पल तयार करण्याची सर्व प्रक्रिया हातानेच करत असत. असे करण्याने प्रक्रियेसाठी जास्त वेळ लागत असे व त्यातून किरकोळ त्रुटी रहात असत. सदर उद्योगासाठी त्यांनी युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा राजारामपुरी, कोल्हापूर यांचेकडून प्रथम मुद्रा शिशु कर्ज घेतले व सदर कर्जाची पूर्ण परतफेड केल्यानंतर मुद्रा तरुण योजना अंतर्गत सी.सी. रुपये ४.५० लाख व टर्म लोन रुपये ५.०० लाख इतके कर्ज घेतल्यानंतर त्यांनी कोल्हापूरी चप्पल क्लस्टर अंतर्गत अद्ययावत चप्पल उत्पादन युनिटची उभारणी केलेली आहे. ज्यामध्ये अप्पर लेदर स्किलिंग मशिन, सोल ग्रायंडीग व बफिंग मशीन, स्टिचिंग मशिन इत्यादी उपलब्ध आहेत. आता त्यांच्या इथे या मशिनरीच्या सहाय्याने उत्कृष्ठ प्रतीच्या चपला बनविल्या जात आहेत. आता ते प्रदुषणमुक्त व मानवी शरीरास इजा अथवा त्रास होणार नाही अशा पद्धतीने काम करू शकतात. त्यांनी www.kolhapurchappalcluster.com अशी स्वतःची वेबसाईट सुद्धा सुरू केलेली आहे व त्यांच्या उत्पादनांस भरघोस प्रतिसाद लाभत आहे. हे सर्व त्यांना मुद्रा कर्ज योजनेमुळे शक्य झाले.*



